# छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (CSMRDA)

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे एक महत्वाकांक्षी व धोरणात्मक नियोजन करणारे प्राधिकरण आहे. प्राधिकरणाच्या कार्याचा व्यापक प्रसार, ओळख व दृष्टीकोन प्रतिबिंबित करणारे नवीन बोधचिन्ह (Logo) व बोधवाक्य (Tagline) तयार करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांसाठी खुली स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

**स्पर्धेचा विषय:** 1. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी कल्पक, अर्थपूर्ण व सौदर्यपूर्ण बोधचिन्ह तयार करणे.

2. प्राधिकरणाच्या कार्यपध्दती, दृष्टीकोन व शहराच्या विकासाची दिशा अधोरेखीत करणारे बोधवाक्य सूचविणे.

**शेवटची तारीख:** दि.08/08/2025 पर्यंत.

**कोण सहभागी होऊ शकतो:** सर्व नागरीक, व्यवसायीक डिझायनर, विद्यार्थी, कलाकार, सर्वसामान्य नागरीक, ग्राफीक्स डिझायनर, वास्तु विशारद, अभियांत्रीकी तज्ञ.

**स्पर्धेसाठी मार्गदर्शक सूचना:**

1. बोध चिन्हाची रचना करताना या प्रदेशाची औद्योगिक, सांस्कृतिक, नैसर्गिक आणि मानव निर्मित वारस्याची (industrial, cultural, natural and built heritage) ओळख लक्षात घ्यायला हवी.
2. प्राधिकरणाचे उद्दिष्ट प्रदेशात संतुलित विकास निर्माण करणे हे आहे. त्यामुळे प्राधिकरणाने भविष्यातील हाती घेण्यात येणाऱ्या विकास कामे निसर्गाचे संवर्धन साधून करावयाचे असल्याने याचे प्रतीक बोध चिन्हाची रचनामध्ये दाखवण्याचा प्रयत्न करणे अपेक्षित आहे.
3. प्राधिकरणाच्या उद्दिष्टांचा एकंदर संदेश देण्यासाठी सदर बोध चिन्हामध्ये या बाबींचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे. नागरिकांकडून प्राधिकरणाच्या बोध चिन्हा सहित बोध वाक्य देणे देखील अपेक्षित आहे.
4. बोधचिन्ह नाविन्यपुर्ण असणे आवश्यक आहे.
5. प्राधिकरणासाठी एक सर्जनशील आणि अर्थपूर्ण बोध चिन्ह तयार करण्यासाठी नागरिकांनी सर्व संभाव्य आकार, प्रमाण, रूपे किंवा प्रदेशासाठी अतिशय अद्वितीय असलेले कोणतेही चिन्ह किंवा रंग वापरण्याचे स्वातंत्र्य असेल.
6. बोध चिन्ह कसा असायला हवा याकरिता नागरिक महाराष्ट्रातील इतर प्राधिकरणे जसे कि. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे इ. यांचे बोध चिन्हे पाहू शकता. अधिक माहितीकरिता प्राधिकरणाच्या अधिकृत संकेत स्थळाला भेट द्या (www.csmrda.in)
7. स्पर्धकांनी आपली वैयक्तीक माहिती, तयार केलेले बोधचिन्ह आणि बोधवाक्य प्राधिकरणाच्या website वर उपलब्ध करून देण्यात आलेल्या google form मध्ये भरणे बंधनकारक आहे. तसेच सदर वैयक्तीक माहिती व तयार केलेले बोधचिन्ह व बोधवाक्य logocsmrda@gmail.com या

E-mail वर सादर करावे व Hard copy समक्ष अथवा स्पीड पोस्टव्दारे या कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील.

8. नागरिकांनी AI चा वापर करुन तयार केलेले बोध चिन्ह कोणतेही प्रकारचे Copy rights / Trademark/Registered यांचे उलंघन करित नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.याबाबत कोणतेही कायदेशीर बाब उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील.

9. बोध चिन्ह तयार करतेवेळी Google /Printerest shtterstock इत्यादी संकतेस्थळावरुन Downloaded नसावी.

10. स्पर्धकाने सदर प्रतियोगिते मध्ये सादर केलेले बोधचिन्ह आणि बोधवाक्य हे प्राधिकरणाच्या मालकीचे असेल त्यावर स्पर्धकास कोणताही मालकी हक्क सांगता येणार नाही व त्याबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

11. सदर स्पर्धा कोणतेही टप्प्यावर रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. महानगर आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना असतील. याबाबत कोणतेही प्रकारचे निर्णय अंतिम करणेबाबत चे सर्व अधिकार मा. महानगर आयुक्त यांना असतील.

12. सदर निर्णयाबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

**स्पर्धेसाठी पारितोषिक निश्चिती :**

1. प्रथम पारितोषीक: रुपये 20000/-
2. व्दितीय पारितोषीक: रुपये 15000/-
3. तिसरे पारितोषीक : रुपये 10000/-
4. उत्तेजनार्थ पारीतोषीक (2): रुपये 5000/- प्रत्येकी.

**माहितीसाठी संपर्क:** छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, विभागीय आयुक्त कार्यालय परीसर, दिल्ली गेट, छत्रपती संभाजीनगर-431001. दुरध्वनी क्रं. 0240-2994988